# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्रं. 155/2024 दिनांक : 01.05.2024

## 1)चोरी :–

**उमरी :–** दिनांक 30.04.2024 रोजी 13.15 वा. चे सुमारास, **ढोल उमरी ता. उमरी जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हनुमान मंदीराचे बांधकामासाठी जमा केलेले पैसे महाराष्ट्र ग्रामीण बॅक उमरी येथे जमा करत असतांना काऊंटर वर ठेवलेले नगदी 1,15,000/–रूपये कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी माधव दिगांबर बैनवाड, वय 42 वर्षे, व्यवसाय शेती रा. ढोल उमरी ता. उमरी जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरनं 150/2024 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री कदम, मो.क्रं. 9623658510** हे करीत आहेत.

## 2)गंभीर दुखापत :–

**1)मरखेल :–** दिनांक 29.04.2024 रोजी 06.30 वा. चे सुमारास, **मौजे अमदापुर ता. देगलूर जि. नांदेड येथे,** यातील नमुद तीन चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस शेतीच्या जुन्या कारणावरून आरोपीतांनी फिर्यादीचा मोठा भाऊ यांना शिवीगाळ करून लाथाबुक्याने मारहाण करून लोखंडी रॉडने, औताचे रूमनाने, काठीने मारहाण करून गंभीर दुखापत केली व जीवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी अनिल किशनराव शिंदे, वय 34 वर्षे, व्यवसाय शेती रा. आमदापूर ता. देगलूर जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे मरखेल** गुरन 83/2024 कलम 326,323,,504,506,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/94 बारी, मो.नं. 9921761460** हे करीत आहेत.

**2)किनवट :–** दिनांक 26.04.2024 रोजी 22.00 वा. चे सुमारास, **आरोपीचे घरासमोर बेंदी तांडा ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील नमुद तीन चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस जुन्या भांडणाचे कारणावरून आरोपीतांनी शिवीगाळ करीत असल्याने फिर्यादीने शिवीगाळ करू नका आमचे घरी जेवणाचा कार्यक्रम आहे असे समजुन सांगितले असता आरोपीतांनी फिर्यादीचा हात जोराने पिरघळल्याने हाताचे हाड मोडुन फॅक्चर केले व फिर्यादीचे पुतण्यास फावडयाचे दांडयाने छातीवर पाठीवर मारून गंभीर दुखापत केली तसेच घरातील महिला व मुलांना लाथाबुक्याने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी कैलास गुलाब राठोड, वय 55 वर्षे, व्यवसाय शेती रा. बेंदी तांडा ता. किनवट जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरन 112/2024 कलम 325,323,,504,506,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1913 राठोड, मो.नं. 9767868500** हे करीत आहेत.

## 3)विवाहीतेचा छळ :–

**अर्धापूर :–** दिनांक 25.06.2018 रोजी चे 18.00 वा. पासून ते आज पावेतो, **फिर्यादीचे सासरी व माहेरी पावडेवाडी जुनी वाडी बु. ता. नांदेड ह.मु. शेलगाव ता. अर्धापूर जि. नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस औरंगाबाद येथे घर बांधकाम करण्यासाठी माहेरहुन तिन लाख रूपये घेऊन ये म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून उपाशी पोटी ठेवुन शारिरीक व माणसीक छळ केला व तुला खतम करतो असे म्हणुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 27 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापूर** गुरनं 202/2024 कलम 498 (अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/631 देशमुख, मो.क्रं. 9923647631** हे करीत आहेत.

## 4)अपघात :–

**बारड :–** दिनांक 30.04.2024 रोजी 08.00 वा. चे सुमारास, **मौजे बारड नेरलीकर यांचे हॉटेल समोर ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक क्रमांक एमएच–34/बीजी–7423 हा हयगय व निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन नमुद ठिकाणी रोडचे कडेला उभ्या असलेल्या सात मोटार सायकलींन वर ट्रक चालवून मोटार सायकलींचे पुर्णपणे नुकसान करून अंदाजे किंमती 2,10,000/–रूपयाचे नुकसान केले व **मयत नामे गोविंदराव रामजी कोडेवाड, वय 73 वर्षे, व्यवसाय शेती रा. खरबी ता. भोकर जि. नांदेड** यांना धडक देवून त्यांना गंभीर जखमी करून त्यांचे मरणास कारणीभूत ठरला व 1) सुनील मोतीसिंग राठोड वय 40 वर्षे रा. रामपुर तांडा ता. किनवट जि. नांदेड 2) संभा सटवा जाधव वय 51 वर्षे रा. भगीरथ नगर, नांदेड यांना धडक देवून गंभीर जखमी करून ट्रक सोडून पळुन गेला. वगैरे **फिर्यादी व्यंकटी मल्लु जंगीलवाड, वय 54 वर्षे, व्यवसाय शेती रा. चेनापूर ता. अर्धापूर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बारड** गुरनं. 30/2024 कलम 279,337,338,304(अ) भादवी सह कलम 184,187 मो.वा. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री केदासे, मो.क्रं. 8483026950** हे करीत आहेत.

## 5)फसवणुक :—

**भाग्यनगर** :— दिनांक 28.04.2024 रोजी 21.50 वा. चे सुमारास, **यशोविहार नगरी वाडी बु. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हि घरी असताना हैद्राबाद येथे घर शोधण्यासाठी housing.com हे app download करून सर्च केले असता रामकी टॉर्वलॉस मध्ये एक प्लॉट उपलब्ध असल्याचे कळाल्याने प्लॉट मालक पंकज यांना त्यांचा मोबाईल नं. 8950384624 वर संपर्क केले असता त्यांनी 2000/—रूपये बुकींगसाठी मागणी केली फिर्यादीने त्यांचे गुगल पे वरून 2000/—रूपये पाठविले व त्यानंतर पंकज चा मॅनेजर प्रदिप कुमार यांना व्हिजिटिंग कार्ड बनविण्यासाठी त्यांचे पंजाब नॅशनल बॅक खाते क्रमांक वर 9099/—रूपये पाठविले असता परत सिस्टम लॉगआउट होत आहे परत 11,000/—रूपये पाठवा असे ते म्हणाले असता फिर्यादीने पैसे पाठविण्यास नकार दिला. यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून प्लॉट बुकींगच्या नावावर ऑनलाईन पैसे घेवून किरायाणे प्लॉट दाखविण्यासाठी बुकींग तसेच जि.एस.टी. रक्कम व व्हिजीटींग कार्ड बनविण्याचा बहाना करून एकुण 20,198/—रूपयाची फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी षण्मुखप्रिया व्यंकटेश जोन्नलगेड्डा, वय 27 वर्षे, व्यवसाय डिझायनर रा. यशोविहार नगरी वाडी बु. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं. 179/2024 कलम 420,34 भादवि सह 66 (ड) आय.टी. ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोनि/श्री शेंडगे,** हे करीत आहेत.

## 6)प्रोव्हिबीशन :—

**भोकर** :— दिनांक 29.04.2024 रोजी 19.00 वा. चे सुमारास, **नांदा म्हैसापाटी ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 1400/—रूपयाची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री सुरेश गोपिचंद जाधव, ने .पोस्टे भोकर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 125/2024 कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/926 कळणे, मो.नं. 8975832298** हे करीत आहेत.

## 7)पाण्यात बडुन मृत्यु :—

**नांदेड ग्रामीण** :—दिनांक 30.04.2024 रोजी 12.00 वा. चे सुमारास, **काळेश्वर बोटींग पॉईंट** नदी **पात्रात नांदेड येथे,** यातील **मयत नामे कासीम पि. शादुल शेख, वय 22 वर्षे, व्यवसाय ड्रायव्हर रा. हळदा ता. कंधार जि. नांदेड** हा नमुद ठिकाणी गोदावरी नदी पात्रात पाण्याचा अंदाज न आल्याने गोदावरी नदी पात्रात पाण्यात बुडून मरण पावला. वगैरे **लालासाब पि. शादुलसाब शेख वय 29 वर्षे व्यवसाय ड्रायव्हर रा. हळदा ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरून **पोस्टे नांदेड ग्रामीण** आ. मृ. **64**/2023 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1224 सुर्यवंशी, मो.नं. 8329712505** हे करीत आहेत.

## 8)गळफास घेवुन शेतकरी आत्महत्या :—

**तामसा** :—दिनांक 26.04.2024 रोजी 05.30 वा. चे सुमारास, **राहते घरामध्ये मौजे घोगरी ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे संतोष लचिरामप्रसाद पांडे, वय 52 वर्षे, व्यवसाय शेती रा. घोगरी ता. हदगाव जि. नांदेड**, यांनी सततची नापीकीला कंटाळुन व कुटूंबाचा उदरनिर्वाह, मुलीचे लग्नाचा खर्च भागविणे अवघड झाल्याने बँकेचे कर्ज कसे फेडावे या चिंतेतुन निराश होवून स्वतःचे घरात गळफास घेवुन आत्महत्या केला. वगैरे **खबर देणार प्रभुप्रसाद लचिरामप्रसाद पांडे, वय 48 वर्षे, व्यवसाय शेती रा. घोगरी ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे तामसा** आ. मृ. **08**/2024 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री डूडूळे, मो.नं. 9022037761** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्रं. 156/2024 दिनांक : 01.05.2024

**नांदेड पोलीस दलातील सात पोलीस अंमलदारांना मा. पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह जाहीर**

नांदेड पोलीस दलातील **1) सपोउपनि/5198 दिलीप पुनमचंद जाधव, ने. ए.टी.एस. नांदेड 2) पोहेकॉ/1715 दिगंबर पंढरीनाथ मुदीराज, ने. (वाचक शाखा), 3) पोहेकॉ/1991 विक्रम बालाजीराव वाकडे, ने. पोस्टे नांदेड ग्रामीण 4) पोहेकॉ/634 संतोष विश्वनाथ सोनसळे, ने. पो.मु. नांदेड 5) पोहेकॉ/1359 मो. असलम मो. हनिफ, ने. ए.टी.बी. नांदेड 6) पोहेकॉ/2118 सिध्दार्थ पुरभाजी हटकर, ने. नागरी हक्क संरक्षण, नांदेड 7) पोहेकॉ/716 दिनेष पारप्पा वसमतकर, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड** असे सात पोलीस अंमलदार यांना त्यांनी केलेल्या उल्लेखनिय कामगिरी व उत्कृष्ट सेवेबद्दल **मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई** यांनी सन्मानचिन्ह जाहीर केले आहे. पोलीस अधिक्षक कार्यालयातील महाराष्ट्र स्थापना दिवसाचे ध्वजारोहण झाल्यानंतर **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड, यांचे हस्ते सर्व पोलीस अंमलदारांना मा. पोलीस महासंचालकांचे सन्माचिन्ह व पुष्पगुच्छ देवून सन्मानित करून त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी **मा. श्री अबिनाश कुमार**, अपर पोलीस अधिक्षक, नांदेड, **श्रीमती किरतिका सी.एम.**, सहा पोलीस अधिक्षक, पोलीस उप विभाग नांदेड शहर, **श्रीमती डॉ. अश्विनी जगताप**, पोलीस उप–अधिक्षक (मु), तसेच पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार उपस्थित होते.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड


Shot on OnePlus


COMMANDO